# श्रीमती विजयादेवी शिर्के एज्युकेशनल ट्रस्ट,

(सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी क्र. ई-२१११ (पुणे), दि. २८.८.१९९५)
शिर्के-सिपोरेक्स उद्योग समूह, ७२-७६, मुंढवा, पुणे : ४११ ०३६.
दूरध्वनी : २०२ : २६७०८१०० फॅक्स : ०२० : २६८७१६१२

विश्वस्त :
विजय शिर्के
अजय शिर्के
अवंती शिर्के

संदर्भ : श्रीविशिएट्रस्ट/ दिनांक : १५.०७.२०२६

प्रति, Principal
Shaskiya Engineering college.
Karad / Satara.

महोदय,

श्रीमती विजयादेवी शिर्के एज्युकेशनल ट्रस्ट, पुणे मार्फत सन १९९७ पासून निवडक ग्रामीण भागातील गरीब, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्त्या प्रदान केल्या जातात. ग्रामीण भागातील काही विद्यार्थी त्यांच्या पालकांच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणाला वंचित होतात, अशा विद्यार्थ्यांना योग्य वेळी आर्थिक हातभार व मार्गदर्शन लाभल्यास, त्यांना उत्तम रितीने आपले शिक्षण पूर्ण करून आपला व्यक्तिमत्व विकास साधता येईल. हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून, ही अडचण दूर करण्यासाठी आर्थिक सहाय्य देऊन त्यांचा भार अंशत: हलका करण्यासाठी सुमारे २०० विद्यार्थ्यांना या वर्षीही शिष्यवृत्त्या देण्याचा न्यासाचा विचार आहे.

या शिष्यवृत्तीसाठी हवेली, वेल्हा, खंडाळा, वाई (सातारा), चिपळूण (रत्नागिरी) व करवीर (कोल्हापूर) या तालुक्यांची सध्या निवड करण्यात आली आहे. आपल्या संस्थेतील प्रथम वर्षातील एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनींची माहिती सोबतच्या अर्जामध्ये भरून पाठविणे अपेक्षित आहे.

विद्यार्थी निवडीसाठी पुढील निकष लावण्यात येतील:

१. विद्यार्थी ग्रामीण भागातील व वरील तालुक्यातील असला/असली पाहिजे.
२. किमान शैक्षणिक गुणवत्ता :
   अ) इयत्ता १० वी ते १२ वी वार्षिक परीक्षेत किमान ७५ टक्के गुण आवश्यक.
   ब) महाविद्यालयीन कला शाखा शेकडा ६५ गुण, कॉमर्स शाखा शेकडा ७० गुण व विज्ञान शाखा शेकडा ७५ गुण.
३. विद्यार्थ्यांचे वर्तन समाधानकारक असल्याबद्दल संस्था प्रमुखांचे शिफारस पत्र.

शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज आपल्या संस्थेमार्फत व आपल्या स्वाक्षरीने आवश्यक ते प्रमाणपत्र जोडून (गुणपत्रक व उत्पन्नाचा दाखला) आमचेकडे दिनांक १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोहोचतील असे पाठवावेत.

कळावे,
आपला,

Kadam
(संजय रा. कदम)

सोबत : शिष्यवृत्तीचा अर्ज

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड
आवक क्रमांक :- 4931
दिनांक - 7 AUG 2026

स.प्रा. (वि.प्र.) — 10/08/26
शिष्यवृत्ती विभाग — 10/08/26
वि.वि. — 10/08/26

**श्रीमती विजयादेवी शिर्के एज्युकेशनल ट्रस्ट,**

(सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी क्र. ई-२१११ (पुणे), दि. २८.८.१९९५)

शिर्के-सिपोरेक्स उद्योग समूह, ७२-७६, मुंढवा, पुणे : ४११ ०३६.

दूरध्वनी : ०२० : २६७०८१००

SMT. VIJAYADEVI SHIRKE EDUCATIONAL TRUST

## शैक्षणिक शिष्यवृत्तीसाठी करावयाचा अर्ज - सन २०२६-२७

| | |
|---|---|
| सूचना : १. | हा अर्ज विद्यार्थ्यांनी स्वतः आपल्या सुवाच्च हस्ताक्षरात भरावा. |
| २. | * चिन्ह असलेल्या माहितीच्या समर्थनार्थ दाखल्याची झेरॉक्स प्रत किंवा सत्यप्रत जोडावी. |
| ३. | योग्य त्या चौकोनात ☑ अशी खूण करावी. |
| ४. | अपूर्ण भरलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही. |
| ५. | **आपण ज्या शैक्षणिक संस्थेत या वर्षी शिक्षण घेत आहात त्या संस्था प्रमुखांमार्फतच अर्ज येणे आवश्यक आहे.** |
| ६. | परीक्षेतील गुणपत्रक, सामाजिक स्थान, उत्पन्न यांच्या समर्थनार्थ दाखल्यांची झेरॉक्स प्रत आवश्यक आहे. |
| ७. | निवास/शैक्षणिक संस्था/व्यवसायाचे ठिकाणांचे पत्ते न्यासाचा पत्रव्यवहार व्यवस्थित पोहोचतील असे असावेत. |

| | | |
|---|---|---|
| १) | विद्यार्थी/विद्यार्थिनीचे संपूर्ण नांव : | |
| २) | शाळा / कॉलेजचे नांव, पत्ता व फोन नं. : | |
| ३) | इयत्ता : | जन्म तारीख : |
| ४) | * वार्षिक परीक्षेत मिळालेले गुण (सन २०२५-२६ चे गुणपत्रक जोडावे) | |

| विषय | | | | | | | | | एकूण गुण | टक्के |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मिळालेले गुण | | | | | | | | | | |
| पैकी | | | | | | | | | | |

गुणक्रमांक :

| ५) | अभ्यासपूरक उपक्रम : (२०२४-२५ व २०२५-२६) | अभ्यासेतर उपक्रमः (२०२४-२५ व २०२५-२६) |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

६) आमच्या न्यासाची शिष्यवृत्ती मिळत होती का ? (मिळत असल्यास खालील चौकोनात ☑ अशी खूण करा)

| २३-२४ | | २४-२५ | | २५-२६ | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

मिळत असल्यास रक्कम रु. . . . . . . . .

*इतर शिष्यवृत्ती मिळते का ? मिळत असल्यास, मासिक/वार्षिक रक्कम रु. . . . . .

| | | |
|---|---|---|
| ७) | विद्यार्थ्याचे शिक्षणासाठी निवासस्थान पूर्ण पत्ता व संपर्कासाठी फोन नं. | ----------------------------------------<br>---------------------------------------- |